महाराष्ट्र शासन
इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
कार्यालयमहात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था ,यवस्थापकीय संचालक
(महाज्योती)महाराष्ट्र राज्य नागपूर
पत्ता : डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३ रा माळा, दीक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर – ४४० ०२२
दूरध्वनी क्र.०७१२- २९५९३८१ CIN No. U85300PN2019NPL187405 ई-मेल: mahajyotingp@gmail.com

जावक क्र. महाज्योती/नागपूर/आस्था/२७८८ /२०२३-२४ दि. २१/१२/२०२३

## -:परिपत्रक:-

**विषय:- महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) परीक्षा पूर्व प्रशिक्षण २०२३-२४ अंतर्गत प्रतिक्षायादीकरिता विद्यार्थ्यांना प्रशिक्षण संस्था निवडण्याकरिता लिंक उपलब्ध करून देणे बाबत.**

महाज्योतीमार्फत दि. २५ व २६ ऑक्टोबर २०२३ रोजी **महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) २०२३-२४** परीक्षा पूर्व प्रशिक्षणाकरिता चाळणी परीक्षा घेण्यात आलेली होती. विद्यार्थ्यांच्या बैठक क्रमांकानुसार प्राप्त गुणांची यादी दि.२०/११/२०२३ रोजी महाज्योतीच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार विद्यार्थ्यांना प्रशिक्षण केंद्र निवड करण्याचा पर्याय दि.२७/११/२०२३ ते दि.३०/११/२०२३ पर्यंत महाज्योतीच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेले होते.

या अनुषंगाने विद्यार्थ्यांनी नोंदविलेल्या पर्यायानुसार विद्यार्थ्यांची निवड यादी दि.०४/१२/२०२३ रोजी महाज्योतीच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली तसेच निवड झालेल्या विद्यार्थ्यांना नमूद करून देण्यात आलेल्या प्रशिक्षण संस्थेत रुजू होण्याकरिता दि.०५/१२/२०२३ ते दि.१५/१२/२०२३ पर्यंत मुदत देण्यात आली, परंतु दि.१६/१२/२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या परिपत्रकानुसार विद्यार्थ्यांना प्रशिक्षण संस्थेस रुजू होण्याकरिता दि.२०/१२/२०२३ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांपैकी ज्या विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केलेला नाही त्या विद्यार्थ्यांच्या ऐवजी प्रतिक्षा यादी मधील विद्यार्थ्यांची निवड करण्याची प्रक्रिया हाती घेण्यात आलेली आहे. ज्या विद्यार्थ्यांची निवड झालेली नाही अशा सर्व विद्यार्थ्यांना प्रशिक्षण केंद्र निवड करण्याचा पर्याय, विद्यार्थ्यांना त्यांच्या अर्जामधील जातीची वर्गवारी, लिंग, दिव्यांग किंवा अनाथ असल्याबाबतच्या नोंदी सुधारण्यासाठी पुन:श्च महाज्योतीच्या संकेतस्थळावर दि.२५/१२/२०२३ दुपारी ३.०० पर्यंत लिंक उपलब्ध करून देण्यात येत आहे.

या लिंकद्वारे विद्यार्थ्यांनी आपली माहिती गरज असल्यास सुधारित करून घ्यावी तसेच प्रशिक्षण संस्थेची निवड करावी. विद्यार्थ्यांनी केलेल्या नोंदणीच्या आधारे प्रतिक्षा यादीमध्ये विद्यार्थ्यांचे गुण विचारात घेऊन निवड करण्यात येईल. **विद्यार्थ्यांनी चुकीची माहिती भरल्यास आणि संस्थेची निवड न केल्यास त्यांची निवडीकरिता कोणत्याही प्रकारे विचार केला जाणार नाही** याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

(स्वा)
(राजेश खवले)
व्यवस्थापकीय संचालक
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण
संस्था, (महाज्योती), नागपूर